सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,**
मिल कॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती संभाजीनगर- 431 001.
दुरध्वनी क्रमांक 0240-2240591,फॅक्स क्र.0240-2240596
ई मेल :-cp.aurangabad@mahapolice.gov.in

ई-निवीदा सुचना जा.क्र./२०२५/3288 छत्रपती संभाजीनगर दिनांक २५/०२/२०२५

पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर अधिपत्या खालील पोलीस स्टेशन/शाखा/कार्यालय येथील शासकिय कामकाजाचे कागदपत्रांच्या छायांकित प्रती काढण्यासाठी तसेच पोलीस स्टेशन येथील तपासीक अमलदार यांचे गुन्हयाचे तपासाचे कागदपत्रांच्या छायांकित प्रती काढण्यासाठी सन २०२५-२०२६ या वर्षासाठी पुरवठादार व्यक्ती,संस्था, ई.कडुन विहित नमुन्यात ई-निवीदा मागविण्यात येत आहेत.

**निवीदा कामाचे वार्षीक अंदाजीत मुल्य रु. २०,००,०००/- (अक्षरी रुपये वीस लाख फक्त)**

| अ.क्र | कामाचे स्वरुप | ई-निवीदा प्रपत्र किंमत (टेंडर फिस) | बयाना रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद शहर अधिपत्या खालील कार्यालय / शाखा येथील शासकिय कामकाजाचे कागदपत्रांच्या छायांकित प्रती काढण्यासाठी तसेच पोलीस स्टेशन येथील शासकिय कामकाजाचे कागदपत्रांच्या छायांकित प्रती व तपासीक अमलदार यांचे गुन्हयाचे तपासाचे कागदपत्रांच्या छायांकित प्रती सन २०२५-२०२६ या वर्षासाठी पुरवठादार व्यक्ती,संस्था, ई.कडुन विहित नमुन्यात ई-निवीदा मागविण्यात येत आहेत. | **रुपये. ५४००/-** | **रुपये.९०,०००/-** | दि.०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६ पर्यंत राहील. |
| | निवीदा माहिती | | | |
| ०१ | वरील कामाची संपुर्ण माहिती महाराष्ट्र शासनाचे **Http://mahatender.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असुन, दिनांक २५/०२/२०२५ सकाळी ११.०० वाजे पासुन ते दिनांक ०६/०३/२०२५ सायंकाळी १७.०० वाजे पर्यंत डाऊनलोड करता येतील व या कामाची निवीदा प्रपत्र याच संकेतस्थळावर दिनांक २५/०२/२०२५ सकाळी ११.०० वाजे पासुन ते दिनांक ०६/०३/२०२५ सायंकाळी १७.०० वाजे पर्यंत भरता येतील. | | | |
| ०२ | निवीदे बाबत आवश्यक बाबी.<br>अ) लिफाफा क्रं ०१ मध्ये समाविष्ट करावयाच्या बाबी.<br>A)ई-निवीदा फार्मची रक्कम व इसारा/बयाना रक्कम हि फक्त Online Net Banking व्दारे | | | |

| | |
|---|---|
| | स्विकारण्यात येत असल्याने सदरील रक्कम भरल्या बाबतची पावती.<br>B) संस्था/पुरवठादार नोंदणीकृत असल्याचा दाखला.<br>C) पॅनकार्ड प्रत, GST No.नोंदणी प्रमाणपत्र.<br>D) मागील तीन वर्षाचे वार्षीक उलाढाल विषयक तपशिल (C.A चे प्रमाणपत्र )<br>E) आयकर विभागाचे नादेय दाखला (आयकर रिटर्न भरल्या बाबतचे मागील तीन वर्षाचे प्रमाणपत्र .<br>F) निवीदेतील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे रु.५००/- च्या बाँड पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे.<br>G) निवीदाधारक व्यक्ती/संस्था यांचा काळया यादीत समावेश नसल्या बाबत तसेच संस्था/फर्म ही दिवाळखोर नसल्याबाबत ५०० रु.च्या बॉन्ड पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे.<br>उपरोक्त A ते G वरील कागदपत्राच्या प्रती स्कॅन करुन Online Upload करावी लागेल. |
| ०३ | ब) लिफाफा क्र.२ दरपत्राबाबतची माहिती निवीदा सोबत देण्यात आलेल्या BOQ-File मध्येच सर्व करासहित (जीएसटी सहीत) दर नमुद करणे आवश्यक राहिल. |
| | **निवीदा बाबत अटी व शर्ती** |
| ०१ | सदरील निवीदेचा करार कालावधी हा कार्यदेश दिनांक पासुन दि.३१.०३.२०२६ पर्यंत असेल. |
| ०२ | निविदा दिनांक १०/०३/२०२५ रोजी सायंकाळी १७.०० (शक्य झाल्यास) वाजता मा.पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) यांचे दालनात उघडण्यात येईल प्रथम लिफाफा क्र ०१ (तांत्रीक लिफाफा) उघडण्यात येईल. त्यानंतर लिफाफा क्र ०१ मधील कागदपत्राचे छाननी अंती निवीदाधारक पात्र झाल्यानंतरच लिफाफा क्र ०२ BOQ-File उघडण्यात येईल. |
| ०३ | लिफाफा क्र.०१ ची तपासणी केल्यानंतर पात्र निवीदाधारकांचे लिफाफा क्र.०२ BOQ-File उघडण्यात येईल. |
| ०४ | नोंदणीकृत पुरवठादार/संस्थेचे शासकिय कार्यालयास सदरील कामाचा अनुभव असल्यास तसे अनुभव प्रमाणपत्र जोडावे. |
| ०५ | शासकिय कागदपत्राच्या काढण्यात येणा-या छायांकित प्रती उत्तम दर्जाचे असणे आवश्यक आहे. |
| ०६ | ई-निवीदाधारकास कोणत्याही प्रकारचे अग्रिम दिले जाणार नाही. |
| ०७ | झेरॉक्स प्रती काढणेसाठी झेरॉक्स मशिनला उच्च प्रतीची शाई आणि पेपर वापरणे बंधनकारक असेल. निवीदेतील कोणत्याही अटीचा भंग झाल्यास सदर कंत्राट नामंजुर करण्याचे व अनामत रक्कम जमा करण्याचे अधिकार मा.पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवले आहेत. |
| ०८ | सर्व पोलीस स्टेशन/शाखा/कार्यालय यांचे झेरॉक्स प्रती काढणेसाठी सोईचे दृष्टीकोणातुन ई-निवीदाधारकास ०१ झेरॉक्स मशिन पोलीस स्टेशन छावणी, व ०१ झेरॉक्स मशिन पोलीस स्टेशन क्रांतीचौक येथे कार्यरत ठेवावी लागेल. सदर दोन्ही ठिकाणी झेरॉक्स प्रती काढणेसाठी लागणारा सर्व खर्च (जसे झेरॉक्स पेपर, इंक, ऑपरेटर,) ई-निवीदाधारकास करावा लागेल. तसेच झेरॉक्स मशिनसाठी लागणारा विदयुत प्रवाहासाठी विज कनेक्शन करीता स्वतंत्र मिटर/सबमिटर ई-निवीदाधारकास घ्यावे लागेल. |
| ०९ | ई-निवीदाधारक यांनी प्रत्येक पोलीस स्टेशन, शाखा/कार्यालय यांचेसाठी विहित नमुन्यात स्वतंत्र रजिस्टर ठेवुन काढलेल्या छायांकित प्रतीची सदर रजिस्टरवर विहित नमुन्यात नोंद घ्यावी लागेल. व महिण्याचे शेवटी देयकासोबत सदर रजिस्टर वरील नोंदीची छायांकित प्रत प्रमाणित करुन सादर करावी लागेल. |
| १० | ई-निवीदाधारकाने दाखल केलेल्या देयकामधुन प्रचलित नियमाप्रमाणे सर्व कर/ TDS/GST कपात करण्यात येईल. |
| ११ | निवीदा मंजुर झालेल्या पुरवठादाराने (०७) दिवसाच्या आत सुरक्षा रक्कम **रु.६०,०००/-** (अक्षरी |

| | |
|---|---|
| | रुपये साठ हजार फक्त ) PA to COMMISIONER OF POLICE AURANGABAD या नावाने धनादेशाव्दारे जमा करणे आवश्यक आहे. |
| १२ | कोणत्या अटीच्या अर्थाबद्दल किंवा ईतर कोणत्याही बाबतीत विवाद उदभवल्यास मा.पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील. |
| १३ | निवीदाधारकाने दर नमुद करताना त्यामध्ये भरावे लागणारे वेगवेगळे कर (जीएसटी) इ. बाबी विचारात घेऊन दर नमुद करावा. यशस्वी निवीदाधारकास या कार्यालयाकडुन कोणतेही शासकिय/निमशासकिय कराची रक्कम देण्यात येणार नाही आणि त्याबाबच्या माफीचे कोणतेही प्रमाणपत्र देण्यात येणार नाही. |
| १४ | प्राप्त निवीदा स्विकारणे अथवा नामंजुर करणे ,आवश्यक वाटल्यास काम विभागुन देणे अथवा उपरोक्त अटी व शर्तीमध्ये कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करण्याचा/राखुन ठेवण्याचा तसेच सुधारणा करण्याचा हक्क/अधिकार मा.पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवला आहे. |
| १५ | निविदा दाखल करताना/ भरताना ऑनलाईन प्रक्रियामध्ये काही तांत्रिक दोष निर्माण झाल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही त्यामुळे अर्धवट निवीदा स्विकारली जाणार नाही व यास कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येणार नाही. |
| १६ | निविदा दाखल करतांना/भरतांना अडचण /शंका उपस्थित झाल्यास Email ID eproc. support@ Maharashtra.gov.in, cppp- support@nic.in या Helpline वर संपर्क करावा. |
| १७ | ई निविदा पुर्णतः अटीमुक्त असावी. अटी टाकुन भरलेली निविदा फेटाळयात येईल. |
| १८ | यशस्वी पुरवठा धारक यांनी कामाचे देयक प्रत्येक महिण्याच्या ०५ तारखे पर्यंत महिना निहाय देयके सादर करणे बंधनकारक राहील तसेच निधी उपलब्धते नुसार देयकाची अदायगी करण्यात येईल.देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यासाठी वेगळे विलंब शुल्क देण्यात येणार नाही. |

**(मा.पोलीस आयुक्त यांचे मान्यतेने)**

**सोबत :- परिशिष्ट एक**

( शिलवंत नांदेडकर)
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्तालय छत्रपती संभाजीनगर

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,**
मिल कॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती संभाजीनगर- 431 001.
दुरध्वनी क्रमांक 0240-2240591,फॅक्स क्र.0240-2240596
ई मेल :-cp.aurangabad@mahapolice.gov.in

## परिशिष्ट -एक

झेरॉक्स कापी काढण्या करीता दर

| अ.क्र. | तपशिल | **दर** ( प्रती प्रत सर्व करासहित) |
|---|---|---|
| ०१ | PAPER SIZE A/4 | |

( शिलवंत नांदेडकर)
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्तालय छत्रपती संभाजीनगर